# महिला सशक्तीकरण आणि पंडिता रमाबाई

**प्रा.अविनाश भोरे** प्रमुख, मराठी विभाग मिरज महाविद्यालय, मिरज.

---

**प्रस्तावना** :-

आज व्यक्ती आणि समाज यांच्याकडे बघण्याचा व्यापक, जाती-धर्म, लिंग भेदातील दृष्टीकोन बळावत चाललेला आहे. परंतु दीडशे-दोनशे वर्षांपूर्वी जाती-धर्म व्यवस्थेचा विलक्षण पगडा समाजमनावर होता. एकीकडे जागतिकीकरणाचा प्रभाव वाढीस लागला आहे; तर दुसरीकडे मूलतत्त्ववाद बोकाळत चालेला आहे. एकीकडे स्त्री देहाची विटंबना, देहप्रदर्शन, बाजारुवृत्ती बळावत चाललेली आहे. एकीकडे शिक्षणाची दारे सर्वांसाठी खुली झालेली आहेत; तर दुसरीकडे स्त्रीचा घर आणि नोकरी सांभाळताना गोंधळ उडालेला आहे. एकीकडे स्वेच्छा व सक्तीच्या निवृत्तीचे प्रस्थ यामुळे विविध उद्योग, कारखाने बंद होत आहेत. यामुळे पुरूषांना घरी बसण्याची वेळ आलेली आहे यातून उद्भवणाऱ्या संघर्षातून कुटुंबव्यवस्थेवर विपरीत परिणाम होऊ लागलेला आहे. या परस्परविरोधी घटना सुज्ञांस विचार करायला लावणाऱ्या आहेत. तशाच संघर्षातून यथायोग्य निर्णयही घ्यावयास लावणाऱ्या आहेत. दोनशे वर्षापूर्वीच्या धार्मिक सामाजिक परिस्थितीत स्त्रियांना करावा लागणारा संघर्ष आणि विकासाची दारे सताड उघडलेली असताना आत्मविकासासाठी स्त्रियांना करावा लागणारा संघर्षही विलक्षण आहे. त्यामुळे त्या काळातील व्यक्तींनी, काळाचं आव्हान कसं स्वीकारलं आणि काळाला आव्हान कसं दिल हे पाहणं उद्बोधक आहे. आज धर्मनिरपेक्ष दृष्टिकोनातून त्या व्यक्तींकडे, त्यांच्या कार्याकडे पाहिलं की त्यांचे थोरपण विशेषत्वाने जाणवते. कोकणस्थ चितपावन ब्राह्मण कुटुंबात जन्मास आलेल्या रमाबाई डोंगरे यांच्या जीवनात घडलेली स्थित्यंतरे म्हणजे त्यांनी काळाच्या हाकेला दिलेली उत्तरे होती. रमा डोंगरे, पंडिता रमाबाई सरस्वती, रमाबाई डोंगरे-मेधावी, मेरी रमा अशा स्थित्यंतरांतून आज पंडिता रमाबाई म्हणून त्या सर्वांना परिचित आहेत. हिंदू धर्म भारतीय संस्कृती व तत्त्वज्ञानावर पोसला गेलेला रमाबाईंचा पिंड ख्रिस्ती धर्म स्वीकारल्यानंतरही आहार, विहार पोषाख यातही पूर्णपणे भारतीयच राहिला. ''पंडिता रमाबाई यांचे जीवन म्हणजे साक्षात परमेश्वराने लिहिलेली एक अमर आणि अविस्मरणीय कादंबरी !'' आचार्य अत्रे यांचे हे उद्गार पंडिता रमाबाईंचे कार्य जाणून घेण्याची उत्सुकता वाढवणारे आहेत.

**शोधनिबंधाची गृहीतके :-**

1. १९व्या शतकातील स्त्री जीवनावर विविध अनिष्ठ रुढी, प्रथा परंपरांचा पगडा होता.
2. पंडिता रमाबाईंना महिला सशक्तीकरणासाठी अनेक अडचणींना सामोरे जावे लागले.
3. तत्कालीन परिस्थितीत महिला विषयक पंडिता रमाबाईंनी केलेले कार्य मोलाचे ठरते.

**उद्देश** :-

1. रमाबाईंनी स्त्री सशक्तीकरणासाठी केलेल्या कार्याचा अभ्यास करणे.
2. रमाबाईंच्या कार्यातील अडचणी जाणून घेणे.
3. रमाबाईंनी केलेल्या कार्याचे परिणाम जाणून घेणे.

**संशोधन पद्धती :-**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा वापर केला असून पंडिता रमाबाई यांच्या जीवनावर प्रकाशित झालेल्या साहित्याचे संकलन करून त्याचा उपयोग केला आहे.

समकालीन महिलांची स्थिती :-

समकालीन या संज्ञेमध्ये त्या काळातील समाजव्यवस्थेचा परिचय होतो. पंडिता रमाबाई यांचा जन्म २३ एप्रिल, १८५८ रोजी झाला. त्यांचा कालखंड हा एकोणिसाव्या व विसाव्या शतकाला व्यापून टाकतो. त्यांच्या कार्याने समकालीन स्त्री जीवन व्यापकतेने समजासमोर येऊन जाते. पंडिता रमाबाई यांच्या काळात स्त्री शिक्षण ही गोष्ट म्हणजे फार कठीण बाब होती. स्त्री शिक्षण समाजाला अजिबात मान्य नव्हते. स्त्री फक्त चूल आणि मूल यामध्येच गुरफटून रहावे हेच समाजाला हवे होते. एकंदरीत एकोणिसाव्या शतकात स्त्री शिक्षणाबाबत समाजात फार मोठी उदासिनता होती. यासाठी त्यांना समाजाचा विरोधही पत्करावा लागला होता. ज्या काळामध्ये मुलीचा जन्म झाल्यास नाक मुरडली जात होती. ज्या काळात बालविवाह होत होते मुलीला अविवाहीत ठेवणे पाप समजले जात होते. पतिनिधनानंतर सती जाण्यात धन्यता मानली जात होती. स्त्रीने शिक्षण घेणे, घराबाहेर पडणे, प्रवास करणे निषिद्ध मानले जात होते. त्या काळामध्ये पंडिता रमाबाई विद्धवता बंगाल सारख्या पुरोगामी प्रांत स्वीकारतात हे सारे मराठी समाजाला विस्मयचकित करणारे होते. ज्या काळात स्त्रीला शिक्षणापासून वंचित ठेवले होते त्या काळात वीस वर्षाच्या त्या तरूणीला अठरा हजार श्लोक मुखोद्गत होते. प्रतिकूल परिस्थितीमध्ये रमाबाईंची

ज्ञानाची भाषा शिकण्याची ओढ कायम राहिली. कुटुंबासोबत बराच प्रवास झाला होता. शिक्षणातून आत्मविश्वास मिळाला होता. तत्कालीन स्त्रियांना जो धार्मिक बंधनाचा, रूढी-परंपरांचा दबाव सहन करावा लागे. त्यापासून रमाबाई मुक्त होत्या. त्या काळात मुलगी आठ-नऊ वर्षाची झाली की तिचा तातडीने विवाह करून देत. बालजरठ विवाह, बालविधवा, केशवपन सर्व रूढींमध्ये मुलींच्या देहाचा, मनाचा काहीही विचार केला जात नसे. मात्र रमाबाईनी स्वत: तरूण वयात विवाहाचा निर्णय घेतला आणि बिपिन बिहारी मेधावी शूद्र वर्गातले होते. आपल्या आयुष्यातील स्वाधीनता, स्वयंनिर्णय क्षमतेचा वापर रमाबाईंनी स्त्री जागृतीसाठी केला. ब्राह्मण किंवा उच्चवर्णिय यांचं समाजातील स्थान जरी वरचं असलं तरी स्त्रिया धार्मिक बंधनांमध्ये जखडल्या होत्या. बालवयात लग्न, गर्भधान विधी, वयस्कर पुरूषाबरोबर लग्न, लहान वयातील मातृत्व, मुलगा नसल्यास पतीचं दुसरं लग्न, वैधव्य आलं तर केशवपन, ऐकवेळचं जेवण, वैधव्यानंतर इतरांकडून होणारे अत्याचार, कुमारी माता, मुलींच्या आत्महत्या असं वातावरण सगळीकडे होते. ही परिस्थिती रमाबाईंना अस्वस्थ करणारी होती. ती सुधारण्यासाठी त्यांनी अथक प्रयत्न केले.

**आर्य महिला समाजाची स्थापना :-**

स्त्रियांची स्थिती सुधारण्याच्या चळवळीचे कार्य रमाबाईंच्या हातून होण्यास सुरूवात झाली होती. त्यांच्या सभांना गर्दी होत होती. यावेळी त्यांची निंदा झाली. पुणे, मुंबई मध्ये त्यांच्या सभा होत होत्या या सभांना त्यांनी 'आर्य महिला समाज' हे नाव दिले. त्याच्या शाखा गावोगावी स्थापन करण्यासाठी त्यांचे महाराष्ट्रभर दौरे सुरू झाले. स्त्रियांचा उद्धार हे या संघटनेचे प्रमुख उद्दिष्ट होते. धर्म आणि परंपरेच्या जोखडातून बाल विधवांना मुक्त करण्याचा तो प्रयत्न होता. त्यात शिक्षण आणि स्वालबनाला प्राधान्य होते. १ मे १८८२ मध्ये पुणे, ७ ऑक्टाबर १८८२ रोजी अहमदनगर येथे आणि महाराष्ट्रात इतरत्र 'आर्य महिला समाज' या महिला संघाच्या शाखा सुरू झाल्या. स्त्रियांच्या उद्धाराविषयाची व्याख्याने व कार्य याद्वारे सुरू झाले. त्यावेळच्या सभांसाठी येणाऱ्या पुरूषांनी बरोबर किमान एका स्त्रीला आणलंच पाहिजे अशी अट रमाबाईनी घातली. त्यामुळे सभांना स्त्रिया येऊ लागल्या.

त्या काळात एकीकडे समाजसुधारणा करणं ही पुरुषांची मक्तेदारी राहिली होती. अशावेळी रमाबाईंच्या नेतृत्वाला परंपरावाद्यांनी साहजिकच विरोध केला. रमाबाईंच्या समकालीन सुधारक स्त्रिया स्वतंत्र विचार करत होत्या. त्यांच्या पतीच्या आदर्शानुसारच पुढे जात होत्या. रमाबाई मात्र स्वयंप्रेरणेने, कोणी सुधारणा शिकवण्याची वाट न पाहता कोणत्याही वादाला न घाबरता खंबीरपणे स्त्री स्वातंत्र्याचा विचार करत राहिल्या. पुढील काळातील स्वतंत्र विचारांच्या स्त्रियांसाठी रमाबाईंकडून मिळालेली ही प्रेरणा महत्त्वाची ठरली.

**हंटर कमिशन पुढे पंडिता रमाबाई :-**

आर्य महिला समाजाची स्थापना ठिकठिकाणी करत असताना सर डब्लू.डब्लू हंटर या इंग्रज शिक्षण तज्ञाच्या अध्यक्षतेखाली शिक्षणाबद्दल चौकशी करण्यासाठी एक मंडळ पुण्यात आले. १८८२ मध्ये रमाबाईंनी हंटर कमिशनपुढे साक्ष दिली. ती महत्त्वाची आहे. आपले स्पष्ट विचार सांगून रमाबाईंनी आपली बाणेदार वृत्ती दाखवून दिली. यात नुकत्याच शाळेत जाणाऱ्या मुलीस लग्नाच्या बेडीत अडकवणे, स्त्रियांना शिक्षण देण्यासाठी शिक्षकांची नेमणूक केली तर अधिकाधिक मुली शिक्षण प्रवाहात येतील, शाळा तपासणीसाठी स्त्री निरीक्षक असाव्यात, इंग्रजी भाषत्ो शिक्षण द्यावे, स्त्रियांना वैद्यकीय शिक्षणासाठी परवानगी द्यावी, स्त्रियांच्या आरोग्यासाठी उपचारांसाठी पावले उचलावीत या मागण्यांचा समावेश होता. रमाबाईंना इंग्रजी येत नसल्याने त्यांची साक्ष मराठीतून झाली. हंटरसाहेबांनी त्यांचे इंग्रजीत भाषांतर करवून ते छापून घेतले. इतके ते बाईंच्या साक्षीने प्रभावीत झाले होते. रमाबाईंच्या साक्षीला इंग्लंडमध्ये मोठा प्रतिसाद मिळाला. इंग्लंडमधून महिला डॉक्टर, नर्सेस पाठवण्याच्या व्यवस्था करण्यात आली. स्त्रियांकरिता विशेष दवाखाने, रुग्णालये उघडण्याची व्यवस्था केली गेली. रमाबाईंची साक्ष म्हणजे फक्त त्यांचीच नसून, देशातील अनेक स्त्रियांचे ते मनोगत आहे.

तत्कालीन स्त्रियांमध्ये सुधारणा व्हावी, तिचा दर्जा कौटुंबिक, सामाजिक, शैक्षणिक आरोग्यदृष्टीने सुधारावा यादृष्टीने रमाबाईंची हंटर कमिशनपुढील साक्ष महत्त्वाची ठरते व त्याचे दूरगामी परिणाम त्या काळातच दिसून येतात. स्त्रियांचा उद्धार यादृष्टीने विचार करताना आपले नैतिक मनोधैर्य वाढविण्यासाठी त्यांनी धर्मासंबंधीचा विचार करण्यास सुरूवात केली. त्याबाबत विचार करणे महत्त्वाचे आहे.

रमाबाई ख्रिस्ती का झाल्या ?

लंडन या ठिकाणी वैद्यकीय शिक्षण घेण्यासाठी दोन वर्षांच्या मनोरमेला घेऊन रमाबाई २० एप्रिल, १८८३ रोजी निघाल्या. तेथे गेल्यानंतर आध्यात्मिक आणि धार्मिक याविषयी सिस्टर जिराल्डीन व रमाबाई यांच्यात चर्चा चालत. तेथे धर्मतत्त्वांवर शुष्क पांडित्य आढळून येत नव्हते तर प्रत्यक्ष कृती केली जात होती. अंत:करणाला भारून टाकणारी प्रीति,

स्वार्थत्याग आणि सेवा ही बाईंच्या अनुभवास आली. ख्रिस्ती धर्मशास्त्राच्या शिक्षणावर आधारित अस्तित्वात असलेल्या अनेक धार्मिक संस्था पाहून पंडिता रमाबाई चकीत झाल्या. प्रभू येशूने बालकांवर प्रेम केले, असे पवित्र प्रमाणावर चाललेले अनाथ बाल-बालिकाश्रम रमाबाईंनी पाहिले. येशूने उपेक्षित महिलांचा उद्धार केला. तेथे अशाच उपेक्षित स्त्रियांकरिता चालविलेली आश्रयस्थाने त्यांना पाहावयास मिळाली. रुग्णालये, अनाथशाळा, आश्रम या संस्था पाहून तेथील मानवतावादी सेवा पाहून रमाबाईंना आश्चर्य वाटले. अज्ञानामुळ आणि बिकट परिस्थितीमुळे चिंधड्या झालेल्या अशा असाह्यांची जोपासना पाहून रमाबाईंच्या मनावर उत्कृष्टपणे ठसले. हिंदूशास्त्रांच्या आधारावर हिंदूसमाज अशा असह्य स्त्रियांशी अत्यंत निर्दयतेने वागतो. याची जाणीव रमाबाईंना झाली. येशू ख्रिस्ताचा प्रेम, शांती, सेवाभावी वृत्तीचा आदर्श त्यांना प्रिय वाटला. ख्रिस्ती धर्मात आनंदाचे निदान सापडल्यावर ख्रिस्ती धर्माचा अधिक जोमाने अभ्यास करण्यास त्यांनी सुरूवात केली. सहा वर्षाच्या धर्मत्यागानंतर आणि बायबलचा अभ्यास केल्यानंतर कॅनन बटलर यांच्या हस्ते रमाबाईंनी आपल्ाी कन्या मनोरमासह २९ सप्टेंबर १८८३ रोजी बाप्तिस्मा घेतला. धर्मांतरचा त्यांचा निर्णय स्वत:चा होतो. तो त्यांनी विचारपूर्वक घेतला. म्हणून त्या त्याला धर्मांतर म्हणत नाहीत, तर 'धर्मांगीकार' म्हणतात. रूढ धर्म विचाराची चिकित्सा करताना स्त्रियांना जिव्हाळ्यानं वागणूक देणाऱ्या धर्मव्यवस्थेचा शोध घेण्याचा हा ध्यास होता.

**तळ हृदयातला स्त्रीचा आवाज :-**

आनंदीबाई जोशी यांच्या डॉक्टरकीचा पदवीदान समारंभाचे आमंत्रण आल्याने रमाबाई १८८६ मध्ये अमेरिकेला गेल्या. अमेरिकेत त्यांनी जवळपास सर्व मोठ्या शहरांमध्ये प्रवास केला. विविध ठिकाणी भाषणं दिली. 'आंतरराष्ट्रीय महिला परिषद' या जगभरातील स्त्रीवादी प्रतिनिधींच्या सभेमध्ये उपस्थित राहून 'हिंदूस्थानातील स्त्रिया' यावर भाषण केले. स्त्री जीवनाचं, समस्यांचं स्वरूप त्यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर नोंदवलं. त्यांना व्यापक स्तरावर पाठिंबा मिळाला आणि तिथे 'रमाबाई असोसिएशन' स्थापन करण्यात आली. आर्थिक पाठबळ तयार करून भारतात स्त्रीशिक्षण करण्याचं उद्दिष्ट होतं. पुढे जपान, हाँगकाँग येथूनही त्यांना आमंत्रण आलं. तिथे जाऊन भाषणे देऊन पुढील कार्यासाठी आर्थिक मदत मिळविण्याचे काम केले. ज्याकाळात स्त्रियांनी चपला घालाव्यात का, स्वेटर घालावा का, इंग्रजी भाषा शिकावी का यासाठी वादविवाद होत होते. त्या काळात रमाबाई जगप्रवास करत स्त्रीशिक्षणाचा प्रश्न व्यापक स्तरावर नेतात. पारतंत्र्यात ढकलणाऱ्या रूढी परंपरांचं बंधन तोडून टाकून व्यापक स्तरावर विचार व्यक्त करून पाठिंबा मिळवणाऱ्या त्या पहिल्या भारतीय स्त्री म्हणता येतील.

१८८७ मध्ये 'द हाय कास्ट हिंदू वूमन' हे इंग्रजी पुस्तक रमाबाईंनी लिहिले. भारतीय स्त्री जीवन पाश्चात्यांना परिचय करून द्यावा हा या लेखनाचा मुख्य उद्देश होता. आपल्या समाजाविषयीचे त्यांचे निरक्षण सूक्ष्म होते. यामधील त्यांच्या लेखनाला जाहिरपणे दिलेल्य भाषणाची लय आहे. हिंदू धर्माने ज्या रूढी-परंपरा स्त्रीच्या माथी मारल्या त्याविषयी त्यांना मनस्वी चीड आहे. चितेच्या अग्नीपासून पळून गेल्यातरी स्त्रिया लोकांच्या दाहक नजरात 'सती' जातातच हे या अनुभवातील स्त्री सुलभ निरीक्षण फार महत्त्वाचे आहे. जेथे स्त्रियांनी हातात लेखणी घेतली तर ती विधवा होते. असा समज प्रचलित होता, त्याच देशातील एक स्त्री अमेरिकन लोकांना आपल्या लेखणीचे सामर्थ्य दाखवते. रमाबाईंना देशातील महिलांसाठी देशात कार्य करण्यासाठी संस्था बांधणी करताना अनेक अडचणी आल्या त्यासंबंधी कार्य पाहताना त्यांची दूरदृष्टी, निश्चयी स्वभाव, धीटपणा यांचा परिणाम होतो.

**शारदा सदन स्थापना :-**

अनाथ, दुर्दैवी, अपंग, विधवा अशा स्त्रियांची सेवा करून त्यांना स्वालंबी जीवन जगता यावे यासाठी कार्य करण्याच्या उद्देशाने रमाबाईंनी मुंबईमध्ये ११ मार्च, १८८९ रोजी या संस्थेची स्थापना केली. अठरा विद्यार्थीनी असलेले 'शारदा सदन' दीड वर्षाने मुंबईपेक्षा पुण्यातली हवा फार चांगली व मुंबईपेक्षा महागाई कमी म्हणून नोव्हेंबर १८९० मध्ये पुणे येथे हालवण्यात आले. स्त्रियांच्या लेखन-वाचनाला व इतर सुधारणांना पाप समजले जाण्याचे प्रकार पुण्यात अधिक प्रमाणावर चालत. म्हणून बाईंना ते पुण्यात असावे असे वाटले असेल. त्या काळात कर्मठ पुणेकरांना शारदा सदनचे अस्तित्व सहन झाले नाही. बाईंचे विरोधक पेटून उठले. नाना तऱ्हेचे आरोप त्यांच्यावर करणेत आले. पंडिता रमाबाई नावाची राक्षशीण आहे, ती मुलींचा छळ करते. मुलींना बाटवते वगैरे; परंतु बाईंकडे येणाऱ्या मुलींची संख्या वाढतच होती. तिथे राहणाऱ्या मुली सुखाने नांदत होत्या. पण एकीकडे विघ्नसंतोषी माणसे त्यांना सुखासुखी काम करू देत नव्हती. त्याचवेळी आपल्या दुर्दैवी कथा सांगत मुली सदनात दाखल होत होत्या तर दुसरीकडे रमाबाई ख्रिस्ती धर्माची सुवार्ता सांगण्यासाठी सदनाचा उपयोग करत नाहीत, म्हणून ख्रिस्ती समाज त्यांच्यावर नाराज होता. रमाबाईंना जिवे मारण्याच्या धमक्या येत; पण त्या कधी डगमगल्या नाहीत. शारदा सदनाचे काम अधिक उत्तम कसे होईल याचाच विचार आणि कृती त्या करीत राहिल्या.

आज ‘शारदा सदन’ ही ‘मुक्ती’ मधील प्राथमिक शाळा आहे आणि मुलींच्या पुढच्या शिक्षणासाठी मनोरमा गर्ल्स हायस्कूल आहे.

**मुक्ति मिशन :-**

२४ सप्टेंबर १८९८ रोजी स्थापन झाली. पुण्यापासून चौतीस मैलावर असलेल्या केडगाव येथे रमाबाईंनी शंभर एकर पडीक जमीन विकत घेतली. येथे इमारती बांधून वेगवेगळ्या इमारतीत वेगवेगळी कार्ये सुरू झाली होती. भारतातील अंधासाठी चालविलेली पहिली शाळा म्हणजे ‘मुक्ती मिशन’ मधील ‘बार्तमी सदन’ होय. दुष्काळातून आलेल्या या सदनातील स्त्रिया स्वेटर विणणे, वेताच्या खुर्च्या विणणे, केळीच्या सोपटीच्या टोपल्या तयार करणे. वाकाच्या दोऱ्या तयार करणे. इत्यादी कामे करीत असत. अनेक प्रकारची कामे मुलींना शिकविली जात. तेल तयार करणे, दुग्धालयात काम करणे, धुणी, स्वयंपाक, याचबरोबर शेती, विणकाम, शिवणकाम अशा कामात त्यांना तरबेज केले जात असे.

विपरीत परिस्थितीत सापडलेल्या अनेक स्त्रियांना काही दृष्पवृत्तीची माणसे वाममार्गाला लावीत होती. तेव्हा रमाबाईंनी त्या मुलींना-महिलांना मुक्ति मिशनचा आधार दिला. त्यांच्यावर सुसंस्कार घडवून त्यांना चांगल्या मार्गाला लावले. त्यामुळे ख्रिस्ती धर्म व समाज याविषयी त्या मुलींना आकर्षण वाटले. तर त्यात काही वावगे नव्हते. रमाबाईंनी अन्य सेवा केंद्रानाही मदत दिली. या केंद्राना मदत पाठविण्याचा निर्णय जेव्हा त्यांनी घेतला तेव्हा ‘मुक्ती’ मधील सर्वांनीच रविवारचे एक वेळचे जेवण न घेण्याचा निश्चय केला होता. १८९६ मध्ये मध्यप्रदेश व १९०० या वर्षामध्ये गुजरात मध्ये दुष्काळाने कहर केला तेव्हा अनेक लहान मुले व स्त्रिया अनाथ झालेल्या होत्या. या सर्वाची संख्या १३५० इतकी होती. त्यांच्या पालकत्वाची जबाबदारी रमाबाईंनी घेतली. या सर्वांना उद्योगाला लावायचे, स्वावलंबी करायचे म्हणून एक एक लहानसा उद्योगही त्यांनी सुरू केला, अशा पिढीतांना सांभाळत, सेवा करत आनंद मानणाऱ्या रमाबाईंना परमेश्वराची सेवा केल्यासारखे वाटत असे.

**रमाबाई : कुटिरोद्योगाच्या जनक :-**

महिलांना स्वावलंबी करण्यासाठी रमाबाईंनी जुजबी शिक्षण देऊन स्त्रियांना अनेक प्रकारचे उद्योग सुरू करून दिले. चाळीस एकर रुक्ष जमिनीतील काही जमीन शेतीसाठी तयार करून तिच्यातून वेगवेगळी पिके काढणे, केळीच्या सोपट्यापासून टोपल्या बनवणे, वाकाच्या दोऱ्या वळणे, वेताच्या खुर्च्या विणणे, लेस-स्वेटर-मोजे विणणे याशिवाय, गायी बैलांचे खिल्लार, शेळ्या-मेंढरांची चरणी, म्हशींचा गोठा, दूधदुभते, कुक्कुटपालन, सांडपाणी-मैल्यापासून शेतासाठी खत, भांड्यांवर नावे घालणे, भांड्यांना कलई करणे, हातमागावर कापड, सतरंज्या विणणे, घाण्यावर तेल काढणे, छापखाना, टाईप जुळवणे-सोडणे, चित्रे छापणे, कागद मोडणे, पुस्तक बांधणे, दवाखाना चालवणे, धोबीकाम हे सगळे उद्योग स्त्रिया करीत असत. ही त्याकाळातील फार नवलाईची गोष्ट ठरली ! सर्व उद्योगांसाठी प्रशिक्षित माणसांकरवी मुलींना तयार केले. की पुढची सगळी कामे मुलीच करीत. खादीचा प्रयोग गांधीजींच्या आधी पंडिता रमाबाईंनी केला होता. शेतात पिकलेले धान्य, भाजीपाला, दुधदुभते यांचा पुरवठा सरकारी ऑर्डर्स घेऊन मुक्ती मिशन करीत असते. मुक्तीच्या कामाचे हिशेब रमाबाई स्वत: रोज बघत असत.

पंडिता रमाबाईंनी स्त्री शिक्षण, स्त्री उद्धार, स्त्री स्वावलंबन, स्त्री विकास यासाठी खूप मेहनत करून विविध संस्था स्थापन केल्या. स्त्रियांना स्वत:च्या पायावर उभे राहता यावे म्हणून त्यांना शारीरिक श्रमाचे महत्त्व समजावून सांगितले. स्त्रियांना आधार देऊन शेतीकाम, विणकाम, मुद्रणकाम, शिवणकाम याबरोबरच जीवनोपयोगी शिक्षण दिले. महिलांची होणारी पिळवळूक थांबवून स्त्री सहाय्यता केंद्र सुरू केले. रमाबाईंचे संपूर्ण आयुष्य स्त्रियांच्या हितासाठी, स्त्री शिक्षणासाठी खर्ची झालेले दिसून येते.

**निष्कर्ष** :-

1. पंडिता रमाबाई आणि समकालीन स्त्री जीवनाकडे पहिले की लक्षात येते स्त्रियांचे सामाजिक, कौटुंबिक व शिक्षण विषयक जीवन फार कठीण होते. स्त्रीने फक्त चूल आणि मूल यामध्येच गुरफटून राहावे. हेच समाजाला हवे होते. ज्या काळात स्त्रीला शिक्षणापासून वंचित ठेवले जात होते. त्या काळात वीस वर्षाच्या रमाला अठराहजार श्लोक मुखोद्गत होते. त्याकाळातील स्त्रियांची स्थिती पाहून रमाबाई अस्वस्थ होते.
2. अनेक संकटे व आव्हानांना सामोरे जात पंडिता रमाबाईंनी स्त्रियांची स्थिती सुधारण्यासाठी चळवळी सुरू केल्या. स्त्रियांचा उद्धार या हेतूने त्यांनी ‘आर्य महिला समाजाची’ स्थापना केली. त्याच्या शाखा महाराष्ट्रभर त्यांनी स्थापन करण्यासाठी प्रयत्न केला. यामाध्यमातून त्यांनी भाषणे, सभा घेवून स्त्रियांना सहभागी करून घेतले. त्यांनी स्त्री स्वातंत्र्याचा विचार समाजाला दिला.

3. स्त्रियांचा दर्जा सुधारावा यासाठी हंटर कमिशन समोर रमाबाईंनी दिलेली साक्ष महत्त्वाची ठरली. त्याचे दूरगामी परिणाम त्याच काळात दिसून आले. महिलांचे शिक्षण, आरोग्य, त्यांचे सामाजिक हक्क याविषयी सुधारणा होवू लागल्या.
4. आपले मनोधर्य नैतिकदृष्ट्या प्रबळ होण्यासाठी धर्मासंबंधीच्या विचार करण्यास रमाबाई जागृत झाल्या. अनाथ, पिडीत, गोर-गरीबांसाठी प्रभू येशू ख्रिस्ताची विचार धारा त्यांना प्रभावी वाटली. लंडनमध्ये असताना त्यांना धर्मतत्त्वांवर शुष्क पांडित्य आढळून येत नव्हते. तर प्रत्यक्ष कृती केली जात होती हे त्यांनी पाहिले. अनेक सेवाभावी संस्था त्यांनी पाहिल्या. बायबलचा अभ्यास केला. धर्मांतराचा त्यांचा निर्णय स्वत:चा होता. तो त्यांनी विचारपूर्वक घेतला. म्हणून त्याला त्या धर्मांतर न म्हणता 'धर्मांगीकार' म्हणत. ख्रिस्ती होऊनच त्यांनी आपले कार्य केले.
5. अमेरिकेमध्ये 'हिंदूस्थानातील स्त्रिया' यावर भाषणे केली. स्त्री जीवनाच स्वरूप त्यांनी जगाला दाखवून दिले. तिथे पाठिंबा मिळवून रमाबाईंनी आपल्या देशात स्त्रीशिक्षण सुरू केला.
6. अनेक आव्हाने अडचणींना सामोरे जात रमाबाईंनी 'शारदा सदन' व 'मुक्ति मिशन' या स्त्रियांच्यासाठी संस्था उभारल्या. त्यातून अनेक महिलांना आपला उद्धाराचा मार्ग सापडला.
7. महिलांना स्वावलंबी करण्यासाठी स्त्रियांना अनेक प्रकारचे उद्योग सुरू करून दिले. त्यामधील शिक्षण दिले. स्त्रियांना स्वत:च्या पायावर उभे कले.

पंडिता रमाबाई यांच्या प्रतिभेची, कार्याची झेप मोठी आहे. स्त्रियांच्या प्रगतीचे मुख्य आधार शिक्षण, ज्ञान, स्वावलंबन, स्वाधीनता, धर्मविचाराची चिकित्सा आणि पुनर्विचार हेच आहेत. हे प्रत्यक्षात आणण्यासाठी त्यांनी भाषण लेखन, प्रवास व संस्था उभारणी अशी वाटचाल केली. स्त्रीमुक्तीच्या टप्प्याआधी स्त्रियांच्या अस्तित्वांचा आणि क्षमतांचा कस निर्माण व्हावा लागतो याचे भान एकोणिसाव्या शतकाच्या प्रतिकूल अवकाशातही पंडिता रमाबाईंनी दर्शवलं आहे. महिला सशक्तीकरणासाठी पंडिता रमाबाईंचे आयुष्य म्हणजे संघर्षाची आणि संकटांची एक दीर्घ साखळी होती. पण त्या कधी खचल्या नाही. याचे नवल वाटते. स्त्री एक व्यक्ती म्हणून विचार आणि विकास करू पाहणाऱ्या पंडिता रमाबाई या सहस्त्रकातील एकमेव कर्मयोगीनी होत्या.

**संदर्भ :-**

1. टिळक, देवदत्त नारायण, २०१२, महाराष्ट्राची तेजस्विनी पंडिता रमाबाई, व्हाईट लाईट पब्लिकेशन्स, पुणे
2. रामटेके, सु.धो. १९५७, अग्रेसर स्त्री वैâवारी पंडिता रमाबाई, रमाबाई मुक्ती मिशन, पुणे
3. उजगरे, अनुपमा, २०१३, पंडिता रमाबाई, साहित्य अकादमी, नवी दिल्ली
4. कार्व्हालो सिसिलिया, २००७, महाराष्ट्राचे शिल्पकार पंडिता रमाबाई, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.